Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *इयत्ता 9 वी च्या संस्कृत पाठयपुस्तकाची मूल्यशिक्षणाच्या सन्दर्भात उपयोगिता*

*चंद्रहास सोनपेठकर व प्रियांका भीमसेन साळुंके*

पुणे

***सारांशः***

सामाजिक वातावरणात व्यक्ती घडत असते, आणि काही श्रेष्ठ, ज्येष्ठ व्यक्ती समाजालाही वळण देत असतात. हे घडवणं, वळण देणं, परस्पर आंतरक्रियेतून चालू असते. म्हणजेच मूल्याचा विचार करतांना समाजाचा विचार करावा लागतो. या सर्व गोश्टींचा विचार करुन मूल्याची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल.

***प्रस्तावना :***

अशी तत्वे जी व्यक्ती, समाज, जग आणि विकास यामध्ये सुसंवाद प्रस्थापित करतात. त्यांना मूल्य असे म्हणतात.

***मूल्यषिक्षण :–***

' मुल्यशिक्षण ' हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडीत आहे. मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्काराचे रोपण मानावे लागते. मानवी जीवनाला आवश्यक असणा–या सदगुणांचे रोपण करण्यासाठी त्या स्वरुपाचे संस्कार मुलांवर करावे लागतात. हे संस्कार शिक्षणानेच शक्य आहेत.

***पाठयपुस्तक परिचय :–***

इयत्ता 9 वी साठी ' संस्कृत – संपूर्ण ' या विषयासाठी ' संस्कृत– तरङ्गिणी ' हे पाठयपुस्तक तयार करण्यांत आले आहे.
संस्कृत शिकण्याचे या विद्यार्थ्यांचे हे दुसरे वर्श आहे, हे लक्षात घेउन गद्य व पद्य पाठांची रचना केली आहे. या पाठयपुस्तकामध्ये गद्य, पद्य, व्याकरण विवेचन व परिशिष्ट असे वेगवेगळे विभाग केलेले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यास अधिक सोयीस्कर झाले आहे.
गद्य विभागामध्ये कचरा–व्यवस्थापनासारख्या अर्वाचीन गोष्टींपासून रामायण– महाभारतासारख्या आर्श महाकाव्यांचा समावेश आहे.
तसेच पद्य विभागामध्ये गेय, अर्थवाही सुभाशितांबरोबर बुद्धिला चालना देणारे काव्यशास्त्र विनोदाचे श्लोक आहेत.
व्याकरण विवेचन या विभागामध्ये नामे, सर्वनाम, धातुसाधित अव्यये, प्रयोग, संधी, समास, धातुसाधित विशेषणे असे आवश्यक तेवढेच व्याकरण समाविष्ट केले आहे व त्यावर भरपूर स्वाध्यायही दिलेले आहेत.
परिशिष्ट विभागामध्ये विद्यार्थ्यांना संस्कृत भाशेत रचना करता यावी यासाठी छोटे निबंध, गोश्टी, संवाद तसेच अपठित गद्य–पद्य यांचा अंतर्भाव केला आहे.
तसेच प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला चित्रे आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना तो पाठ समजण्यास सोपा जातो.

***पाठानुसार मूल्यसंस्कारार्थ उपयोगिता :–***

(अ) गद्य :–

1)पाठाचे नांव :– आदिकविः वाल्मीकिः ।
पान क्रमांक :– 1 मूल्य :– संवेदनशीलता

***वर्णन :–*** प्रस्तुत पाठात ' रामायण ' हे महाकाव्य कसे रचले गेले. याची सुरस कथा सांगितली आहे. एका पारध्याने एका क्रौंच पक्ष्याला बाणाने जखमी केले. जमिनीवर पडलेल्या क्रौंच पक्ष्याला मृत झालेले पाहून क्रौंचपक्षिणी खूप शोक केला. तस्याः क्रन्दनं श्रुत्वा व्यथितो महर्षिः तं व्याधं सहसा अशशत् म्हणजे तिचा आक्रोश ऐकून करूणेने दुःखी झालेल्या महर्शीने पारध्याला शाप दिला. याठिकाणी वाल्मीकींची पक्षाविषयीची संवेदनशीलता दिसून येते.

2) पाठाचे नाव :– दशरथस्य कुटुम्बम् ।
पान क्रमांक :– 4 मूल्य :– सौजन्यशीलता

**Title :** *'''महिलाओं के प्रति अपराध : भारतीय परिदृश्य''*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *संगीता मेश्राम* **yr:2013 vol:3 iss:2**

***वर्णन*** *:–* प्रस्तुत पाठात दशरथ राजाच्या सर्व कुटूंबाचा परिचय करुन दिला आहे. 'पिता मात्रे कैकेय्यै दत्तपवनस्य पालनार्थं रामो राज्यसुरपरित्यज्य दण्डकारण्यं गतवान । सौमित्रोडपि भ्रातरि रामेडतीवास्निहयत् ।' म्हणजे वडिलांनी आईला कैकेयीला दिलेल्या वचनाचे पालन करण्यासाठी राम राज्यसुखाचा त्याग करुन दण्डकारण्याला निघून गेला. लक्ष्मणाचे सुध्दा भावावर – रामावर खूप प्रेम. हे याठिकाणी रामामध्ये असलेली सौजन्यशीलता दिसते.

3)पाठाचे नाव– अवकरः सुवर्णसमः ।
पान कमांक – 7 मूल्य :– नीटनीटकेपणा

***वर्णन*** *:–* कच–यातील वस्तूंचा उपयोग पुन्हा कसा व कुठे करता येईल याविषयी या पाठाता सांगितले आहे. 'अभियानेनानेन दर्शितमवकरः सुवर्णसमः । परं योजकस्तु दुर्लभ ' म्हणजे अभियानामुळे कचरा हा सोन्याच्या बरोबरीने महत्वाचा आहे हे दर्शविले आहे. मात्र योजना करणारा दुर्मिळ असतो.

म्हणजे कच–याची नीट विल्हेवाट लावणे हे प्रदूशण टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

4)पाठाचे नांव :– चन्द्रमाः

पान कमांक :– 10 मूल्य :– संवेदनशीलता, वैज्ञानिक दृष्टि

***वर्णन*** *:–* पुरातनकालादारभ्य चन्द्रमाः कवीनां स्फूर्तिस्थानम् । म्हणजे पुरातन काळापासून चंद्र हा कवींचे स्फूर्तिस्थान आहे. यावरुन चंद्राविशयी असलेली संवेनदनशीलता दिसते. तसेच नील आर्मस्ट्रॉगने चंद्रावर पहिले पाउल ठेवले चंद्रावर जीवसृष्टी आहे का ? पाणी आहे का ?याचे संशोधन चालू आहे या वर्णनावरुन वैज्ञानिक दृश्टिकोन हे मूल्य दिसते.

5)पाठाचे नांव :– समस्यापूर्तिः

पान कमांक :– 13 मूल्य :– नीटनेटकेपणा

***वर्णन*** *:–* भोज हा विदर्भ देशाचा राजा होता. तो संस्कृतविद्येचा पुरस्कर्ता होता. अनेक उत्तमोत्तम कवींचा आश्रयदाता होता. रजा कवींच्या कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी स्वतः चौथा चरण रचून देई व तीन चरण रचण्यास कवींना आवाहन करी. याला 'समस्यापूती' म्हणतात. प्रस्तुत पाठात समस्यापूर्ती करण्यास राजाने कवींना सांगितले. अशाप्रकारे यामध्ये नीटनीटकेपणा मूल्य दिसते.

6)पाठाचे नांव :– निःस्पृहस्य तृणं जगत् ।

पान कमांक :– 16 मूल्य :– राष्ट्भक्ती

***वर्णन*** *:–* एकदा आर्य चाणक्यांच्या झोपडीमध्ये मध्यरात्री एक चोर आला. थंडी असूनही ते घोंगडी असूनही जमिनीवर झोपले होते याचे कारण चोराने विचारले असता ते म्हणाले, '' कम्बला नृपेण दरिद्रेशु वितरणार्थ महयं दत्ताः । तेशामुपयोगे न मम अधिकार मनसा परितुष्टोडहं न दरिद्रः । किं मे कम्बलै ?'' इति '' । म्हणजे राजाने मला गरिबांना वाटण्यासाठी या घोंगडया दिल्या असल्याने त्यावर माझा अधिकार नाही. मनाने संतुश्ट असलेला मी दरिद्री नाही. तेंव्हा मला घोंगडयाची गरज नाही. यावरुन चाणक्याची आपल्या राजावर, राज्यावर असलेले प्रेम दिसून येते म्हणून इथे ' राश्ट्भक्ती ' आढळते.

7)पाठाचे नांव :– अचलपंद ध्रुवपदम् ।

पान कमांक :– 19 मूल्य :– संवेदनशीलता

***वर्णन*** *:–* ध्रुव बालपणापासून स्वाभिमानी होता म्हणून वडिलांच्या मांडीवरुन खाली ओढून सावत्र मातेने केलेला अपमान त्याला सहन झाला नाही. म्हणून त्यांनी ठरविले की, ''यस्मात् स्थानात् न कोडपि मांच्युतं कुर्यात् तं स्थानं प्राप्तुमिच्छामि ।''

म्हणजे ज्या स्थानापासून मला कोणी ढकलणार नाही. ते स्थान मी मिळवू इच्छितो '' ध्रुव '' त्याच्या दृढनिश्चयी स्वभावामुळे आपला आदर्श ठरतो. अशाप्रकारे त्याची संवेदनशीलता दिसते.

8)पाठाचे नांव :– चित्रपट महर्षिः दादासाहेब – फाळके महोदया : ।

पान कमांक :– 22 मूल्य :– राष्ट्रभक्ती व सौजन्यशीलता

***वर्णन*** *:–* दादासाहेब फाळके यानी चित्रपटसृष्टीचा शोध लावला. भारतीय संस्कृतीला अनुसरुन चित्रपट बनविण्यासाठी ते लंडनला गेले व चित्रपटनिर्मितीचे तंत्र आत्मसात केले. त्यांनी चित्रपटांमध्ये प्रदर्शित केलेल्या चमत्कृतिपूर्ण दृश्यांनी लंडनमधील लोक प्रभावित झाले. फाळके यांनी तेथेच रहावे अशी विनंती केली मात्र त्यांनी बहुजनानाम् उपजीविकास्य धनक्षमः एशः व्यवसायः स्वदेशे एव कर्तुमैच्छत् चित्रपट व्यवसायस्य पितामहः । म्हणजे अनेक लोकांच्या उपजीविकेचे साधन होउ शकणारा हा व्यवसाय स्वतःच्या देशातच करण्याची इच्छा व्यक्त केली. यावरुन त्यांची राष्ट्भक्ती व सौजन्यशीलता दिसते.

9)पाठाचे नांव :– सचिनस्य पत्रम् ।

पान कमांक :– 24 मूल्य :– श्रमप्रतिश्ठा

***वर्णन*** :– सचिन तेंडूलकरने त्याच्या यशाचे रहस्य अगदी थोडक्यात पत्रातून सांगितले. उत्तमया कीडया शरीरस्वास्थ्यं, मनः स्वास्थ्यं, प्रभूतं धनं, जगति सम्मानं प्राप्तु शक्यते पदं सततोद्योगः आवश्यकः । आलस्यं सर्वदा शत्रुरेव । म्हणजे उत्तम खेळल्याने शरीरस्वास्थ्य, मनःस्वास्थ्य, जगात सन्मान मिळविणे शक्य असते मात्र त्यासाठी निरंतर उद्योगी राहणे आवश्यक असते. आळस हा आपला शत्रू आहे. यावरुन सचिनमध्ये असलेली 'श्रमप्रतिष्ठा' दिसते.

10)पाठाचे नांव :– दश शिक्षेत जपानतः ।

पान कमांक :– 27 मूल्य :– राष्ट्रभक्ती

***वर्णन*** :– दुस–या महायुध्दात अणुबॉम्बमुळे पूर्णपणे उध्वस्त झालेला, विविध आपत्तीनी ग्रासलेला असूनही जपानदेश जगातील प्रगत राष्ट्रामध्ये समाविष्ट आहे. कारण जपानी लोकांनी राष्ट्भक्तीच्या जोरावर संघटित होउन राष्ट्उभारणी केली.

11)पाठाचे नांव :– वंदेमातरम् । (सूलिवाचन)

पान कमांक :– 10 मूल्य :– संवेदनशीलता, वैज्ञानिक दृष्टि

***वर्णन*** :– स्वातंत्र्यपूर्वकाळात ' वंदेमातरम् ' हे शब्द सर्व भारतीयांचा महामंत्र झाले होते. ' वंदे मातरम् ' या शब्दांचा उच्चार करुन अनेक स्वातंत्र सैनिक, कांतिकारी हसतहसत फासावर चढले होते. प्रस्तुत पाठात या गीताचा इतिहास सांगितला आहे म्हणून याठिकाणी राष्ट्भक्ती व सर्वधर्मसहिष्णुता हे मूल्य दिसते.

ब)प्द्य :–

1)पाठाचे नांव – सुभाशितमाला–1 । पान कमांक :– 31 मूल्य :– सौजन्यशीलता

***वर्णन*** :– श्लोक कमांक 3 यामध्ये असे म्हटले आहे की, चंद्राचा शीतलपणा जसा स्वाभाविक आहे तसाच परोपकार करणे सज्जनांचा स्वभाव आहे म्हणून सुभाशितकाराला प्रश्न पडला की चन्द्राला शीतल कोणी केले ? चंद्राचे काम सज्जन करीत असतांना त्याला शीतल म्हणायचे कारणच नाही. यावरुन सज्जनांची सौजन्यशीलता दिसते.

2)पाठाचे नांव – नमो बुद्धाय । पान कमांक :– 35 मूल्य :– राष्ट्रीय एकात्मता

***वर्णन*** :– श्लोक कमांक 5 :– सदोदित बहुजनांच्या हितासाठी व सुखासाठी सदाचरणांवर आधारलेली अशीच ही पंचशील तत्वे आहेत. जगाचे मंगल होण्यासाठी तूच उपदेशिलेली आहेत अशा बुद्धदेवा तुला त्रिवार नमस्कार असो. म्हणजे बहुजनांच्या हितासाठी व जगाचे मंगल होण्यासाठी बुद्धांनी पंचशील तत्वे रचली यावरुन राष्ट्रीय एकात्मता दिसते.

3)पाठाचे नांव – भगीरथवरप्रदानम् । पान कमांक :– 38 मूल्य :– राष्ट्भक्ती

***वर्णन*** :– प्रस्तुत पद्यात गंगेचे पृथ्वीवरील अवतरण कां व कसे झाले याची महाभारतातील सुरस कथा सांगितली आहे. कपिलमुनींच्या कोधाग्नीने भस्मीभूत झालेल्या आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्यासाठी सगरवंशीय भगीरथाने कठोर तपश्चर्या केली व गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर आणले. यावरुन त्याची राश्ट्भक्ती दिसते.

4)पाठाचे नांव – नवयुगजनिता बालिका । पान कमांक :– 41

मूल्य :– स्त्री–पुरुष समानता व राष्ट्रीय एकात्मता

***वर्णन*** :– आज सर्व क्षेत्रामध्ये स्त्रीने आपले श्रेष्ठतव सिध्द केले आहे. तरीही आज तिचा जन्माला येण्याचा हक्कही नाकारला जात आहे. या परिस्थितीविरुध्द बंड करुन उठलेली मुलगी समाजाला स्वसामर्थ्याची जाणीव करुन देते. मी सगळयांचे दारिद्रय, दुःख दूर करणारी, जगात शांतिसौख्याचे वितरण करणारी, शांतियुक्त अहिंसेचा मार्ग दाखविणारी आहे. यामधून स्त्री पुरुष समानता व राष्ट्रीय एकात्मा हे मूल्य दिसते.

5)पाठाचे नांव – सुभाशितमाला–2 । पान कमांक :– 44 मूल्य :– सौजन्यशीलता

***वर्णन*** :– श्लोक कमांक 1 – या श्लोकांत म्हटले आहे की सतत प्रयत्नशील असलेल्या उद्योगी व बुद्धिमान माणसालाच लक्ष्मी प्रसन्न होते. यावरुन श्रमप्रतिष्ठा मूल्य आढळते.
श्लोक कमांक 2 – प्रसंगी प्राण देउन, पैसा देउनही माणसाने परोपगार केला पाहिजे. परोपकाराने जे पुण्य मिळते ते शंभर यज्ञ करुनसुध्दा मिळणार नाही. यावरुन सौजन्यशीलता मूल्य दिसते.

***संदर्भ*** :–

इयत्ता 9 वी संपूर्ण सस्कृत पाठयपुस्तक
Sonpethkar C.D., Values in Raghuvansham, Lakshmi Publication, Solapur.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net